**आरोपी व त्यांचे विधिज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. साक्षीदार अरबाज याकुब शेख सकाळी ११.०० वाजल्यापासुन न्यायालयात साक्षीकरीता हजर. करीता फौ.प्र.सं.कलम ३०९ मधील तरतुदीस अधीन राहुन साक्षीदाराची साक्ष आरोपीच्या अनुपस्थीतीत घेण्यात येत आहे.**

नि.फौ.ख.क्र.१५२/२०२२
शासन विरुध्द सनी
नि.क्र.२१

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी देवाची शपथ खरे सांगतो की,
माझे नाव – अरबाज याकुब शेख ,
वय – २७ वर्षे, कामधंदा – हॉटेल व्यवसाय,
राहणार – बावधन नाका वाई, ता. वाई.

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती कदम –**

दि.०६.०३.२०२२ रोजी पोलीसांनी मला कोठेही पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. त्यावेळी मी मच्छी मार्केटमध्ये समर्थ मोबाईल या दुकानात कामाला होतो तेव्हा पोलीसंनी मला एका कागदावर सही करायला लावली. त्यातील मजकुर मला त्यांनी वाचुन दाखविला नव्हता व मी तो वाचुन पाहिला नव्हता. माझ्यासमक्ष कोणतीही पंचनामा कार्यवाही झाली नव्हती.

***साक्षीदार अभियोगपक्षाच्या कथनास विसंगत साक्ष देत असल्याने त्यास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी सहायक सरकारी अभियोक्ता हयांनी मागीतली. परवानगी देण्यात आली.***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.०६.०३.२०२२ रोजी पोलीसांनी मला गणपती आळी भाजी मंडई वाई येथे समीर बागवान यांच्या दुकानाशेजारी पंचनामा कार्यवाही करण्याकामी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे फिर्यादी हजर होता व

त्याने घटनेची हकीकत पोलीसांना माझ्यासमक्ष सांगितली होती व त्याप्रमाणे पोलीसांनी पंचनामा कार्यवाही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या पंचनाम्यातील मजकुर मी वाचुन पाहिला होता व त्यानंतर मी त्यावर सही केली होती. मी आरोपी यास ओळखत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्रीमती देवकर**

**आरोपी व त्यांच्या विधिज्ञांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. करीता उलटतपास नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

*स्वाक्षरी/-*

दि.०२.०९.२०२३

(आर.एम. भेंडे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

न्यायालय क्र.२,वाई.